# कार्ल गुस्टाव युंग

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - समाज प्रबोधन पत्रिका, संपा. भालचंद्र भणगे, प्रकाशक – ग. प्र. प्रधान, पुणे, नोव्हेंबर-डिसेंबर १९७५)

*टीप : सिंगमंड फ्रॉईड ह्याची माहिती वाचकाला असते. पण तितकी माहिती कार्ल युंग (Jung) ची नसते. मात्र युंग ह्याचेही मनोविश्लेषणातले स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे म्हणून हा लेख देत आहोत. आयर्व्हिंग स्टोन ह्याच्या Passions of the Mind ह्या फ्राईडवरील कादंबरीत फ्राईड-युंग ह्यांची भेट फार सुरेख दिली आहे. त्यातला काही भाग मुद्दामच ह्या लेखाच्या सुरुवातीला कंसात दिला आहे. – संपादक*

[मार्चच्या सुरुवातीस एका रविवारी डॉ. कार्ल युंगने फ्रॉईडच्या दारावरील घंटी वाजविली. नौकराणीने त्याला फ्रॉईडच्या अभ्यासिकेत नेले. दोघेही एकमेकांकडे बघत राहिले, कारण या भेटीकडे दोघांचेही डोळे लागलेले होते.

कार्ल युंग थोराड होता. सहा फुटावर उंच, रुंद छाती आणि भरदार खांदे असलेला. पाषाण कोरणाऱ्या मजबूत हातांचा. डोळेही मोठे. पिंगट केस. चष्म्याखाली शहाणे आणि हसरे डोळे. ताकद आणि आतला जिवंतपणा यांनी भरलेले व्यक्तिमत्त्व.... वर्षानुवर्षे गाढ मैत्री असावी असे हस्तांदोलन करताना फ्रॉईडला वाटले.

"हे एक असे पर्वतशिखर आहे, की याच्यामुळे भोवतालच्या सर्वांची उंची वाढते."

"माननीय प्रोफेसरसाहेब, या क्षणाची मी अनेक वर्षे वाट पाहत होतो." उंच पण कर्कश नसलेल्या स्वरात युंग बोलू लागला. "तुमच्या कार्याखेरीज मला माझ्या कामाची किल्ली सापडली नसती. तुमच्या पद्धतीच्या मनोविश्लेषणाचा झूरिकमध्ये आम्हाला चांगला उपयोग होत आहे. आमच्या हाती आलेली माहिती मी तुमच्याकडे भेटी म्हणून घेऊन आलो आहे. रत्न-माणकांपेक्षा या मला महत्त्वाच्या वाटतात. कारण शास्त्रीय विश्वातल्या आकाशात तुम्ही अबोध मनाच्या सूर्यामुळे नवीन प्रकाश निर्माण केला आहे. मानवी मनाचे हेतू आणि मानवी चारित्र्य यांच्या आकलनापुरते बोलावयाचे, तर तुम्ही अबोधाचा शोध घेईपर्यंत आम्ही अंधाऱ्या गुहेत वावरत होतो. हातातल्या काठ्या हेच उदरनिर्वाहाचे साधन ज्यांच्या हाती होते अशा आमच्या अरण्यवासी पूर्वजांत व लख्ख सूर्यप्रकाशात बाहेर येऊन भूमी नांगरणाऱ्या आणि कसणाऱ्या वंशजांमध्ये जो फरक, तितकाच इथे पण झाला आहे. आता पुन्हा त्या आदिम स्थितीला आम्ही कधीच परतणार नाही. हिप्पोक्रेटसपासून हजारो रुग्णतज्ज्ञांनी जे पाहिले तेच तुम्ही पाहिलेत, पण सत्याचा वेध मात्र तुम्ही घेतला आहे...." युंगचे स्तुतिस्तोत्र चालूच राहिले. फ्रॉईडला आपली स्तुती ऐकण्याची सवय नव्हती. तो अक्षरशः लाजला.

रात्री एक वाजता फ्रॉईडने युंगला हॉटेलवर पोचविले. त्यांनी एकमेकांचा निरोप घेतला तेव्हा जेवणाचा वेळ सोडल्यास त्यांनी तेरा तास अखंड चर्चा केली होती.

फ्रॉईड झोपण्यासाठी खोलीत शिरला तेव्हा मार्थाने त्याला विचारले,

"खरोखरच तो दिसतो तितका चांगला आहे का?"

फ्रॉईड क्षणभर स्तब्ध राहिला.

"होय. कदाचित मला भेटलेली सगळ्यात मोठी व्यक्ती युंग असू शकेल.... मला हे सारं फार महत्त्वाचं वाटतंय. आमची चळवळ पुढे नेण्यासाठी वर्षानुवर्ष ज्याला मी शोधत राहिलो तो माणूस हाच असेल."

फ्रॉईडला आंतरराष्ट्रीय मनोविश्लेषण चळवळीबद्दल बोलावयाचे होते. युंगचा मूड गूढ घटनांच्या सत्यतेविषयी चर्चा करण्याचा होता. पंधरा वर्षांची एक तरुण मुलगी विशिष्ट मनोवस्थेत गेली की सुशिक्षित प्रौढ स्त्रीसारखी बोलू लागे. याकडे आपले लक्ष प्रथम वेधल्याचे सांगून युंग म्हणाला, ...

"... मी पद्धतशीरपणे तिच्या भावावस्थांची नोंद ठेवली आणि जागृतावस्थेत असताना तिचे व्यक्तिमत्त्व कसे होते याचाही अभ्यास केला.... गूढवादावरील साहित्याचे माझे वाचन चालूच होते.... विद्यापीठातल्या माझ्या अध्यापकांनी यात मुळीच आस्था दाखविली नाही.... मग माझ्या वाचनात क्रॅफ्ट एबिंग आला. व्यक्तिमत्त्वाच्या रोगांविषयी मी पूर्वी कधीच ऐकले नव्हते...."

फ्रॉईड अस्वस्थपणे खुर्चीत चुळबूळ करीत होता....

"व्हिएन्नामध्ये गेल्याच आठवड्यात नवीनच आलेल्या 'औजा' फळयांविषयी तू ऐकले आहेस का? त्यात फळयावर एक त्रिकोण ठेवलेला असतो. बोटांनी त्रिकोणाला हलकेच स्पर्श केला की गूढ शक्ती त्या त्रिकोणाला हलवून फळयावर लिहिलेल्या वेगवेगळया अक्षरांवर नेतात...."

युंगचा चेहरा व्यथित दिसला. त्याने दोन्ही हातांनी आपले पोट दाबून धरले. तो आपल्याशीच पुटपुटला.

"... लोखंडाचे बनविलेले... तांबडे लाल... धगधगीत पोकळी..."

त्याच वेळेस पिस्तूल उडविल्यासारखा एक स्फोट झाला. त्यांच्या वर असलेल्या पुस्तकाच्या कपाटातून. दोघेही एकदम उठले.

ते कपाट कोसळणार अशा अपेक्षेने. काहीच झाले नाही.

"पाहा" युंग विजयी मुद्रेने म्हणाला, "हे उदाहरण..."

"छे, काही तरी बोलू नकोस..."

"हे काही तरी नाही. प्रोफेसरसाहेब... तुम्हाला शेक्सपिअरची साक्ष काढण्याची सवय असल्याने मी आपल्याला सुचवू इच्छितो, की तुम्हा तत्त्वज्ञान्यांच्या स्वप्नातही येणार नाहीत अशा अनेक गोष्टी, अरे होरेशिओ, या पृथ्वीवर आणि स्वर्गात आहेत!"

"माझा मुद्दा सिद्ध करण्यासाठी मी असेही भविष्य वर्तवितो, की आता क्षणार्धात आणखी एक स्फोट होईल."

त्याच क्षणी कपाटांमागून पुन्हा आवाज आला. फ्रॉईड युंगकडे आश्चर्याने बघत राहिला. हा प्रकार आहे तरी काय?....

"कार्ल, या साखळीतली एक गोष्ट मला कळत नाही. तुझ्या पोटातल्या लाल उष्णतेने हा स्फोट घडवून आणला, की होणाऱ्या स्फोटाची तुला सूचना मिळून तुझ्या पोटाची धगधगती पोकळी झाली?"]

---

अनेक ज्ञानक्षेत्रांतल्या सांचेबंदपणाला सुरूंग लावणाऱ्या घटना एकोणिसाव्या शतकात घडल्या. मानवी शरीर, मानवी मन, मानवाचा इतिहास, मानवी विश्वाचे स्वरूप यासारख्या ज्ञानशाखांची क्षितिजे एकाएकी विस्तारली. मनोविज्ञानात, आणि विशेषतः मनोविश्लेषणात अपरिचित पण सत्य, धक्का देणारी पण मूलभूत अशी विचारधारा याच शतकात फ्रॉईड आणि युंग यांनी प्रवर्तित केली.

कार्ल गुस्टॉव युंगचा जन्म २६ जुलै १८७५ साली झाला. गुस्टॉव हा स्वित्झर्लंडमधील बासेल या इतिहासप्रसिद्ध गावाजवळील शांत खेड्यात राहणारा धर्मगुरू. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य अभिजात विद्यांचा अभ्यासक. मायाळू, सहनशील आणि एका विशिष्ट मर्यादेपर्यंत खरा उदारमतवादी, पण थांबलेला. मनातल्या धर्मसंबद्ध संशयांनी डोके वर काढू नये म्हणून दक्ष राहणारा, यासाठी विचारापेक्षा श्रद्धा व विश्वास श्रेष्ठ असे सारखे सांगणारा, पण संशयांच्या अस्तित्वामुळे कुजलेला, असा कार्लचा पिता. अंतर्द्वंद्वांमुळे दुबळया झालेल्या व्यक्तिमत्त्वाचा. विश्वासार्ह पण निर्बळ म्हणूनच कार्लच्या लक्षात राहिला. कार्लचे सहा मामा आणि दोन काका हेही सर्व धर्मगुरू आणि शतक एकोणिसावे. शास्त्रीय शोध, यंत्रयुग इत्यादींच्या आक्रमणांनी धर्मभूमी डळमळू लागल्याची साक्ष पदोपदी देणारे आणि अशा परिस्थितीत संशय, प्रश्न, मतभेद यांच्या अस्तित्वांची जाणीव होऊनही त्यांची दखल न घेण्याची निष्फळ धडपड करणारा कार्लचा पिता! त्याच्या मानसिक संघर्षाच्या तीव्रतेची कल्पनाच करवत नाही. याउलट कार्लची आई. भौतिक गोष्टीत मन गुंतलेली. गप्पा ऐकणे व करणे, खाणेपिणे, स्वयंपाकपाणी या साऱ्यात रस असलेली. नवरा-बायकोचे कधी फारसे पटले नाही. कार्ल अवघ्या चार वर्षांचा असताना त्याच्या आईला मनोरुग्ण म्हणून उपचार करून घेण्यासाठी शुश्रुषागृहात काही काळ राहावे

लागले. या वेळी बापानेच आपल्याला खेळविले, भरविले, झोपविले, पण आई मात्र सोडून गेली असा ठसा कार्लच्या बालमनावर पक्का उमटला. स्त्रियांवर कमी अवलंबून राहावे असा कार्लचा पुढच्या आयुष्यात कल राहिला. इतकेच नव्हे, तर या बोचऱ्या अनुभवाचा तात्कालिक परिणाम म्हणून त्याला इसबासारखा काही त्रास झाला. या प्रकारचा त्रास मनोजनित रोगांत मोडतो ही गोष्ट अनेक वेळा मांडण्यात झाली आहे. पण या तात्कालिक धक्क्यापेक्षा कार्लच्या व्यक्तिमत्त्वावर अधिक परिणाम करणारा विशेष म्हणून तो 'आपल्या आईला दोन मने होती व ती अनेकदा परस्परविरोधी निर्णयास पोचत,' याचा उल्लेख करतो. तिच्या दोन मनांचा आविष्कार तिच्या स्वगतातून कसा होई, याचे एक वेधक उदाहरण कार्लने दिले आहे. कार्ल साधारण सहा वर्षांचा असतानाची गोष्ट. शेजारी म्हणून एक शहरी कुटुंब आले. एक कार्लच्या वयाचा मुलगा व दोन धाकट्या बहिणी. अतिशय टापटिपीने राहणारे, नीटनेटके कपडे करणारे हे व्यवस्थित कुटुंब कार्लसारख्या खेडवळांपासून जरा लांबलांबच राही. पण कार्लला वारंवार आदर्श म्हणून शेजारचा मुलगा समोर ठेवला जाई. परिणाम अर्थात् असा झाला, की कार्लने त्या पोराला बदडून काढले. मग सर्व भांडाभांड वगैरे होऊन कार्लला त्याच्या आईकडून मार मिळाला आणि आई अतिशय अस्वस्थ झालेलीही त्याला दिसली. जरासा ओशाळलेला कार्ल गुपचूप काहीतरी खेळत बसला. आई नेहमीप्रमाणे काहीतरी विणत बसली असता अचानक म्हणाली, "अर्थात् कोणीही असले लेंढार बाळगायचे काहीच कारण नाही!" कृत्रिम, पोषाखी व शिष्ट जगाबद्दलचे हे मत दुसऱ्या मनातून आले होते हे कार्लने स्पष्ट केले आहे. आपल्यालाही दोन मने असल्याचा शोध कार्लला लवकरच लागला आणि त्याचा उल्लेख आणि उपयोगही त्याने आपल्या जीवनात वारंवार केला. या सर्व पार्श्वभूमीवर कार्ल नऊ वर्षांचा होईपर्यंत त्याला भावंड नव्हते हे ध्यानात घ्यावे. नंतर एक बहीण होती पण तीही तरुणपणीच गेली. एकलकोंडे बालपण, अनिश्चित व तंग घरगुती वातावरण यामुळे संवेदनाशील कार्ल अधिकच अंतर्मुख बनला असे म्हणण्यास हरकत नाही.

खेड्यातील पंतोजीप्रकारच्या शाळेत कार्लची विद्यार्थीदशा सुरू झाली. शाळेत हुषार म्हणून त्याचा कधीच लौकिक झाला नाही. कारण शिकविलेल्याचा अभ्यास करण्यापेक्षा आवडेल ते वाचण्याकडे त्याचा अधिक कल होता. आपल्या पित्याचे छोटे पण बऱ्यापैकी प्रगल्भ ग्रंथसंग्रहालय कार्ल मनसोक्त धुंडाळत होता आणि समवयस्कांच्या कुवतीबाहेरच्या विषयांच्या अभ्यासात युंग होत होता. त्यात आपले दारिद्र्य, आपले फाटके कपडे याचीही त्याला खंत वाटे. इतर मुलांपासून तो वेगळा पडे. ती त्याला 'अब्राहम बाबा' म्हणत. त्याच्याविषयी वाटणाऱ्या आदरमिश्रित भीतीचे प्रतिबिंब या नामकरणात स्वच्छ दिसते. मास्तरांनाही त्याचे शहाणपण मान्य करणे कठीण जाई. आपल्या वाचनाच्या बळावर कार्लने लिहिलेल्या एका निबंधाचा आवाका पाहून त्याचे शिक्षक इतके स्तिमित झाले, की निबंध कार्लने स्वतः लिहिला नसून कुठून तरी चोरला असल्याचा त्यांनी आग्रह धरला. कार्ल यामुळे बराच क्षुब्ध झाला व शाळेविषयी त्याची अप्रीती वाढती राहिली. शाळेत त्याला गणित, चित्रकला आणि व्यायाम या विषयांनी फार त्रास दिला. अंक म्हणजे काय? अंक अक्षरांनीच कशाला व्यक्त करावे? अ आणि ब मुळात वेगळे असले तर अ = ब असे विधान करता येते? समांतर रेषा म्हणजे ज्या अनंतत्वात मिळतात त्या समांतर रेषा म्हणणे कसे शक्य आहे? यासारखे प्रश्न त्याला गणितासंबंधी पडत. सारे गणित हे काहीशा लहरी नियमांवर आधारले आहे, त्याच्यामागे काही अंतर्गत, मूलभूत संगती नाही असे त्याला वाटे. आपल्या बौद्धिक नैतिकतेला गणितामुळे बाध येई, असे त्याने नोंदविले आहे. इतरांना स्वयंसिद्ध वाटणाऱ्या गोष्टीही सिद्ध करण्याची मागणी करणाऱ्या कार्लची बुद्धिनिष्ठता शिक्षक, शाळासोबती आणि स्वतः कार्लला निरनिराळ्या तऱ्हेने व वेगवेगळ्या कारणासाठी जाचक ठरली ही गोष्ट सत्य. अनुभवावर आधारित असलेल्या संबंधांच्या पलीकडील संबंध व्यक्त करण्याचे प्रयत्न करणारे शास्त्र ते गणित अशी विचारगर्भ भूमिका घेऊन अंकांचे काहीसे गूढ विवेचन करणारा युंग हा कार्ल म्हणून वावरताना गणितात अयशस्वी होता हा योगायोग लक्षणीय म्हटला पाहिजे. चित्रकलेच्या बाबतीत तर याहून कमाल होती. चित्रकलेत संपूर्णतया अक्षम म्हणून कार्लला तो विषयच 'माफ' करण्यात आला. कार्लला चित्रे काढणे जमे पण त्याची कल्पनाशक्ती चाळवली गेल्यावर आंधळ्या ग्रीक पुतळ्यांनी हे कार्य साधत नाही असे म्हटल्यावर शिक्षकांनी त्याच्यापुढे बकऱ्याचे डोके ठेवले! आपल्या स्वप्नांची प्रतिमासृष्टी नीट जाणून घेता यावी

म्हणून चित्रकलेचा उपयोग करून घेणाऱ्या कार्लचा हा दुसरा शालेय पराभव. व्यायामाच्या बाबतीतही अडचण होती ती कार्ल-स्पर्श असणारी. दुसऱ्याने सांगितल्याप्रमाणे व त्यामुळे हालचाल करावयाची हेच मुळात कार्लला मान्य नव्हते.

एकंदरीने कार्ल शाळेवर नाखूष होता. आणि ही नाखुषी त्याने मोठ्या 'खास' रीतीने व्यक्त करण्यास सुरुवात केली. बारा वर्षांचा असताना एकदा तो कॅथीड्रलजवळ उभा होता. एका पोराने धक्का दिल्यामुळे तो डोक्यावर पडून बेशुद्ध झाला. शुद्ध आली तरीही कार्ल तसाच पडून राहिला. एक तर ढकलणाऱ्याला अद्दल घडावी आणि दुसरा सूज्ञ विचार म्हणजे आता शाळेची कटकट सुटणार! तेव्हापासून अभ्यास किंवा शाळा म्हटले, की त्याला फिटस् येत. अर्थातच स्वप्नाळूपणे भटकणे, चित्रे काढणे व कोरणे, विहिरीचे पाणी ओढणे, वाचणे इत्यादी उद्योग मनसोक्त करण्यास तो मोकळा झाला. किमान सहा महिने त्याचे हे 'पिकनिक' चालू होते. आणि मग एकदा वडिलांचे व त्यांच्या एका मित्राचे संभाषण त्याच्या कानांवर आले.

"तुमचा मुलगा कसा आहे?"

"ती एक कर्मकहाणीच आहे... त्याला फिटस् येतात. डॉक्टरांना निदान होत नाही... स्वतःचे पोट भरू शकला नाही तर त्याचे कसे निभणार? मला काही कळेनासे झाले आहे."

कार्लला एकदम वास्तवाची प्रखर जाणीव झाली. आपल्या अभ्यासाचे वास्तव प्रयोजनही त्याच्या लक्षात आले. आता फिटस् बंद असे स्वतःला निक्षून बजावत त्याने अभ्यास सुरू केला. त्याचे शालेय जीवन पुन्हा सुरळीत चालू झाले. आपले बाह्य स्वरूप व अंतःस्वरूप, बाह्य जीवन आणि अंतर्जीवन यांचा समतोल राखण्याचा एक मार्ग त्याने शोधून काढला. आपल्या दोन मनांचे अस्तित्व मान्य करून त्यांची जीवनसरणी तो काहीअंशी वेगळी ठेवू लागला. अभ्यास करणारा, शाळेत जाणारा, परीक्षा पास होणारा हा एक कार्ल आणि मनोवृद्ध, ज्ञानी, आपल्या आवडीच्या विषयात मग्न असलेला तो दुसरा कार्ल. दुसरा बऱ्याच वेळा वर्तमानापेक्षा भूतकाळात रमे. त्याला अठरावे शतक जवळचे वाटे. त्या शतकातल्या वस्तू पाहिल्या की या आपण खूप वर्षे वापरल्या असल्याची भावना त्याला तीव्रपणे व हमखास होई. इतकेच काय, अनेक वेळा तो १८८६ ऐवजी १७७६ असा सन लिही. आपले आजोबा गोएत्ये या प्रतिभावंत कवीचे अनौरस पुत्र होत ही परंपरेने चालत आलेली कथाही याच सुमारास त्याला अस्वस्थ करू लागली. भूतकालाची स्पंदने या ना त्या रूपात जाणवणे हा या सर्वाचा इत्यर्थ म्हणता येईल. युंगच्या कार्याच्या दृष्टीने कार्लची ही घडण अर्थपूर्ण मानता येते. मानवी मनाच्या अबोध भागाची घडण ऐतिहासिक दृष्टीने तपासता येते असे प्रतिपादन करणाऱ्या युंगने दैवतकथांना अपार महत्त्व दिले आणि फाऊस्ट या काव्याचे महत्त्व दैवतकथेचे अर्थघन आविष्कार साधणारे म्हणून त्याने बरेच मानले हेही या संदर्भात नोंदले पाहिजे.

याच काळातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणून जिचा उल्लेख करता येईल ती म्हणजे कार्लच्या मनातील धर्मसंबद्ध संघर्ष. सर्व संघर्षांचे मूळ एक प्रश्न. देवाच्या सृष्टीत खलत्वाला (इव्हिल) स्थान कसे असले पाहिजे असे कार्लचे स्वतःचे, मनाला भावलेले उत्तर. पण तत्कालीन व रूढ धर्ममतांना हे विरोधी. यामुळे कार्ल संत्रस्त झाला. त्याला भासचित्रे दिसू लागली आणि त्यात पावित्र्यभंग असणार या भीतीने तो त्यांना दडपून टाकण्याचा प्रयत्न करू लागला. या घालमेलीने त्याची झोप उडू लागली. हे भासचित्र म्हणजे अबोधमनाने सबोध मनाला पडलेल्या प्रश्नांना दिलेले उत्तर होते. पण या उत्तरात शिष्टमान्य भाग नसल्याने संघर्ष सुरू झाला होता. दिसणाऱ्या भासचित्रात बासेलमधील कॅथीड्रलच्या नव्या चकचकत्या छप्परावर देव नैसर्गिक विधी करतो आणि त्यामुळे छप्पराचे तुकडे होतात असे कार्लला दिसे. यातील अस्वीकार्य भाग कोणता हे सहज समजण्यासारखे आहे. या भासचित्राने सूचित केलेल्या उत्तराचा मागोवा घेत घेत, बायबलला वाट पुसत कार्ल शेवटी अशा निर्णयाला आला, की आदम आणि ईव यांनी पाप केले; कारण त्यांनी पाप करावे असा देवाचा हेतू होता. शालेय जीवनात असताना आणि एकोणिसाव्या शतकासारख्या रूढ धर्मविचाराने भारलेल्या कालखंडात कार्लने अशा निष्कर्षास पोचावे यावरूनच त्याची मानसिक प्रगल्भता आणि धर्मजिज्ञासेची तीव्रता लक्षात येते.

एकोणिसाव्या शतकातील युरोपीय वातावरणात धर्मनिर्णय ही मूलभूत गोष्ट होती, हा निर्णय घेतल्याशिवाय कोणत्याही प्रतिभावंताला आपल्या क्षेत्रात निर्घोरपणे काम करणे अशक्य होते. ऑक्सफर्ड चळवळ, न्यूमनचे लिखाण इथपासून ते ग्लॅडस्टनच्या पत्रांपर्यंत सर्वत्र या सत्याचे प्रतिध्वनी उमटलेले दिसतात. कार्लच्या बाबतीत हा निर्णय ज्या सनातनी कौटुंबिक पार्श्वभूमीवर घेतला गेला त्यामुळे फार धाडसाचा ठरतो. युंग पुढे भारताकडे व भारतीय तत्त्वविचाराकडे वळला तेव्हाही त्याने खलत्वाला सामोरे जाऊन, त्याचा स्वीकार करूनच आपली धर्मश्रद्धा उभारण्याच्या भारतीय व बौद्ध विचारप्रक्रियेचा आवर्जून उल्लेख केला.

शालेय शिक्षणानंतर विद्यापीठात कार्लने कोणते विषय घ्यावेत यावर बरीच 'भवति न भवति' होत होती. त्याच्या मामांना कार्लने धर्मशास्त्र अभ्यासावे असे वाटे, वडील म्हणत धर्मशास्त्री सोडून दुसरा कोणीही हो. स्वतः कार्लला वाटे, की आपण पुरातत्त्वविद्या अभ्यासावी. शेवटी बासेल विद्यापीठात पुरातत्वविद्या शिकवण्याची सोय नाही आणि उदरनिर्वाहाच्या दृष्टीनेही विषय निवडावा असा विचार करून कार्लने १८९५ मध्ये वैद्यकशास्त्राचा विद्यार्थी म्हणून नाव दाखल केले. पुढल्याच वर्षी कार्लचा पिता निधन पावला. बाहेरचे काम करून आणि आपल्या एका आत्याच्या सांगण्यावरून तिच्या घरच्या प्राचीन वस्तू किफायतशीर तऱ्हेने विकून कार्लने आपला खर्च भागविला.

शालेय शिक्षण संपता संपता आणि विद्यापीठातले शिक्षण सुरू व्हायच्या सुमारास आणखीही काही महत्त्वाच्या गोष्टी घडल्या होत्या. कार्लने चर्चचे कर्मकांड पाळणे बंद केले होते. वडील जाण्याआधी त्यांच्याशी आणि आपल्या काही काका-मामींशी धर्म आणि इतर बाबतीत कार्लने काही निर्णायक स्वरूपाचे वादविवाद केले होते. त्यातून कार्लच्या काही पायाभूत श्रद्धा जन्माला आल्या होत्या. वडील कार्लवर बुद्धिवादाच्या आहारी गेल्याचा आरोप करीत. फार विचार करू नकोस, विश्वास ठेव, असे त्यांचे सांगणे असे. कार्ल विचारी, विश्वास का ठेवू ते सांगा. वडील गोंधळत व मग चिडत. कार्ल शेवटी अशा निर्णयाला आला, की विश्वासाचा परमदोष असा की त्यामुळे आगामी अनुभवाची वाट रोखली जाते. लहानपणापासून त्याला स्वप्ने पडत, भास होत, आवाज ऐकू येत. हे सारे गूढवादी म्हणून बाजूला टाकण्यापेक्षा अनुभव म्हणून स्वीकारण्यात कार्लला आपल्या नवीन श्रद्धांचा उपयोग झाला. माध्यमांद्वारा होणाऱ्या मनोवैज्ञानिक प्रयोगात भाग घेण्यापासून ते प्लेटो, पायथागोरस, एम्पीडोक्लीज, हेरेक्लिटस, शोपेनहॉर, नीत्से इत्यादी तत्त्वज्ञ मित्रांकडे वळणे या सर्व गोष्टी वैद्यकशास्त्राच्या या अभ्यासकाला शक्य झाल्या. त्याचाही संबंध त्याच्या काहीशा निधर्मी पण परमार्थाने धर्मप्रेरित नव्या श्रद्धांच्या संदर्भात लावता येतो.

आर्थिकदृष्ट्या दिवस तंगीचे होते. सिगारची भेट म्हणून मिळालेली पेटी दर रविवारी एक सिगार अशा जपणुकीने वापरणे हीही चैन वाटे. काका-मामांची कर्जेही होत होती; पण कार्लच्या बौद्धिक विकासाचे महत्त्वाचे टप्पे गाठले जात होते. त्याच्याच शब्दात सांगायचे, तर मुख्यतः बौद्धिक स्वातंत्र्यलाभाची क्रिया पूर्ण होत होती. सहकाऱ्यांबरोबर कांट, शोपेनहॉर यांचे वाचन होई. धर्मशास्त्र, मानसशास्त्र, यावर कनिष्ठ विद्यार्थ्यांना कार्ल व्याख्याने देई. सिसेरोच्या शैलीतील बारकाव्यापासून चर्चचा इतिहास आणि प्रोटेस्टंट दैवतशास्त्रापासून गूढविद्या या साऱ्यांत कार्ल वावरत होता. विद्यापीठीय आयुष्याच्या पहिल्या वर्षात त्याला असे ठामपणे वाटले, की विज्ञानांच्या अभ्यासाने प्रचंड ज्ञान मिळते; पण अंतर्दृष्टी लाभत नाही. विज्ञानाच्या अंतिम मर्यादा जाणवणे हे कार्लच्या बुद्धिवादी विचारसरणीच्या दृष्टीने निःसंशय महत्त्वाचे होते. दुसऱ्या वर्षी आत्मविद्येवरची पुस्तके त्याच्या हातात पडली. अवकाश, कालतत्त्व, आणि कार्यकारणभाव या पलीकडचे प्रसंग असू शकतात असे म्हणण्यात काय चूक आहे? प्राण्यांना नैसर्गिक उत्पातांची पूर्वसूचना मिळते, काही व्यक्तींच्या मृत्यूची स्वप्नांतून भविष्ये वर्तवली जातात, मृत्यूसमयी घड्याळे थांबतात, काचा फुटतात या गोष्टी खेड्यातल्या बालपणी कार्लने अनुभवल्या नव्हत्या काय? नदी, पर्वत, झाडे, पक्षी यांच्या जगात जे खरे ते शहरी वातावरणात खोटे कसे? असे अनेक प्रश्न त्याच्या मनात उभे राहू लागले. याच वेळेस तुलनात्मक शरीरशास्त्रासारख्या विषयाचा अभ्यासही चालू होता.

१८९८ च्या सुमारास वैद्यकशास्त्रातील कोणत्यातरी विभागाचा विशेषज्ञ होण्याच्या दृष्टीने अभ्यास करण्याची पाळी आली आणि कार्लचा 'युंग' बनण्याच्या प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा टप्पा सुरू झाला.

कार्लपुढे दोन मार्ग होते. शल्यचिकित्सा आणि सर्वसाधारण उपचारविद्या. त्याला स्वतःला शल्यचिकित्सेकडे वळावयाचे होते; पण पुन्हा आर्थिक अडचणी होत्या. त्यात पुन्हा घरात दोन अनाकलनीय प्रसंग घडले. घरातले एक जुने मजबूत लाकडी मेज आणि एक पोलादी सुरी यांना तडे गेले. तडे जाताना मोठे आवाजही आले. याच सुमारास कास्ट-एलिंग याचे मानसोपचाराचे पुस्तक त्याच्या वाचनात आले आणि मनोरुग्णाचिकित्सेवरील व्याख्यानांनाही तो उपस्थित राहिला. या सर्वांचा संकलित परिणाम असा की वस्तुनिष्ठ असूनही आत्मविद्या आणि शरीरविज्ञान यांचा मेळ घालणारी मनोरुग्णचिकित्सा हेच आपले ध्येय असा त्याला प्रत्यय आला. ज्या वेळेस मनोरुग्ण व त्यांचा चिकित्सक हे दोघेही गावाबाहेरच्या कुठल्या तरी मजबूत इमारतीत डांबले जाऊन जवळजवळ वाळीत टाकले जात, त्या वेळेस असा प्रत्यय येणे व त्यानुसार निर्णय घेणे यामागे आत्मनिष्ठा आणि शास्त्रनिष्ठा यांचा कसा अपूर्व संगम झालेला असेल याची कल्पना करणे शक्य आहे. मनोरुग्णचिकित्सा ही मानली जाते तितकी व्यक्तिनिष्ठ (सब्जेक्टिव्ह ) नाही आणि समजले त्यापेक्षा वैद्यकासारखी शास्त्रे आणि आत्मविद्या यांचा अधिक निकटचा संबंध आहे असा दुहेरी विश्वास कार्लच्या निर्णयामागे होता हे निर्विवाद आहे. १० डिसेंबर १९०० रोजी झुरिकमधील बर्गओलझूली मनोरुग्ण चिकित्सालयात मदतनीसाची जागा कार्लने स्वीकारली. ऐतिहासिक, सनातनी आणि कार्ल हा रेव्हरंड गुस्टॉव युंगचा मुलगा असेच मानणाऱ्या बासेलला रामराम ठोकून तो झुरिकला आला तेव्हा साऱ्या विश्वाचे नवे वारे खेळत असलेल्या जागी आल्यासारखे त्याला वाटले. संचालक ब्ल्यूलेर हा एक ज्ञानी आणि शांत माणूस होता. त्याच्याबरोबर आणि इतर सहकाऱ्यांबरोबर बौद्धिक देवाणघेवाण शक्य होती. १९०९ पर्यंत युंग तिथे काम करीत होता. त्याने केलेल्या कार्याची बीजे इथल्या वास्तव्यात होती. रुग्णाबरोबर चोवीस तास राहिल्यामुळे अनुभवांची विविधता आणि प्रत्यक्षता यांचे पाठबळही त्याच्या कार्यास मिळत होते.

युंगचे कार्य दोन तऱ्हांनी पुढे सरकत होते. आपल्या रोग्यांविषयी काही कळावे म्हणून त्याने साहचर्य कसोट्या वापरण्याचा मान्य प्रघात चालू ठेवला होता. पण त्याचबरोबर रोग्यांच्या भासचित्रांनाही तो महत्त्व देत होता. या दोन्हींच्या एकत्रीकरणाने त्याने एक प्रकारची संश्लेषणात्मक चिकित्सापद्धती बनविली होती. त्याच्या अभ्यासाचा मुख्य विषय दुभंगलेले व्यक्तिमत्त्व हा होता. (त्याच्या आईची दोन मने व त्याचे स्वतःचे दोन अवतार या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहेत). त्याच्या मते दुभंगलेले व्यक्तिमत्व म्हणजे दोन स्पष्टपणे वेगळे पडणारे भाग नसून विघटित झालेले पण एकच व्यक्तिमत्व असते. या विघटनानंतर व्यक्तिमत्वाचे काही भाग चिकित्सकाशी संवाद करू शकतात. इतकेच नव्हे, तर रोग्यांचा अहं अशा वेळेस मूक पण शाबूत अवस्थेत असू शकतो असेही युंगचे मत होते. तत्वज्ञान, धर्माचा तुलनात्मक अभ्यास आणि दैवतकथा यांच्या अभ्यासाचे संचित गाठी असलेला युंग याच सुमारास अबोध मनाच्या सामूहिक अवताराचा सिद्धांतही साकार करीत होता. एका बाजूस रोग्यांची भास चित्रे, आभास, स्वप्ने इ. आणि दुसऱ्या बाजूस परंपरेने चालत आलेल्या दैवतकथा, त्यांचे वाङ्मयीन इ. आविष्कार या दोहोंतले साम्य लक्षात घेण्याएवढे आहे असे जाणवून अबोधाचे व्यक्तिगत आणि सामूहिक असे दोन भेद मानले पाहिजेत असे त्याला वाटू लागले होते.

इकडे व्हिएन्नामधून नवे मानसशास्त्रीय विचारप्रवाह वाहत होते. प्रेरकशक्ती होती-सिंगमंड फ्रॉईड. इंटरप्रिटेशन ऑफ ड्रीमस् हे फ्रॉईडचे पुस्तक १८९९ मध्येच प्रसिद्ध झाले होते. युंगच्या वाचनात हे पुस्तक आले आणि तो प्रभावित झाला. दुभंगलेल्या मनाच्या आविष्कारांवर त्यामुळे प्रकाश पडतो असे त्याचे मत झाले. दुभंग व्यक्तित्वाच्या मानसशास्त्रावरील आपला निबंध युंगने १९०७ मध्ये प्रसिद्ध केला व फ्रॉईडला पाठवला. फ्रॉईडला तो मनोवेधक वाटला. त्याने युंगला व्हिएन्नाला आपल्या भेटीस बोलावले. मार्च १९०७ मधली ही गोष्ट. (युंग लिहितो, की ही भेट फेब्रुवारी महिन्यात झाली). जवळजवळ तेरा तास हे दोघे अखंडपणे बोलत राहिले! तेव्हापर्यंतच्या आयुष्यात दोघांनाही एकमेकांइतका समानधर्मी भेटला नव्हता हाच त्याचा अर्थ. युंगपेक्षा फ्रॉईड वीस वर्षांनी

मोठा होता. त्यामुळे युंगच्या मनात फ्रॉईडने पितृस्थान घेणे आणि फ्रॉईडला युंग मुलासारखा वाटणे या दोन्ही घटना बऱ्याचशा स्वाभाविक होत्या. यापुढे जवळजवळ सात वर्षे मनोविश्लेषणाच्या चळवळीतला युंग हा एक महत्त्वाचा घटक होता आणि चार वर्षे तो इंटरनॅशनल सायकोॲनलिटिकल असोसिएशनचा अध्यक्षही होता. १९०९ मध्ये झालेल्या अमेरिका यात्रेत युंग आणि फ्रॉईड दोघेही बरोबर होते. एकमेकांची स्वप्ने ऐकून त्याचे विश्लेषण करणे, मनोविश्लेषणशास्त्राच्या भवितव्यासंबंधी विचारविनिमय करणे, त्याचा निरनिराळया देशात प्रसार व्हावा, त्याला मान्यता मिळावी म्हणून माणसे व संस्था जोडणे, यासारख्या गोष्टीत ते बुडून गेले होते. या दोघांमध्ये कधी मानसिक बेबनाव होईल असे मनातही येणे अशक्य वाटावे इतके मतैक्य या वेळेपर्यंत दोघांत होते, असे दिसते. अर्थात अंतर्मनात तणाव व परस्परविरोध असणे शक्य आहे; पण निदान विरोधासकट एकमेकांचा स्वीकार करण्याइतका सहिष्णू दृष्टिकोण या वेळेपर्यंत दोघांचाही होता असे म्हणता येईल. युंग आपल्या गादीचा वारस असेही फ्रॉईड म्हणत असे. पण तरीही १९११ च्या सुमारास दोघांमधील बेबनावाची पूर्वचिन्हे दिसू लागली. १९१२ मध्ये त्यांचे तीव्र मतभेद दिसण्याइतके वर आले आणि १९१३ साली ते एकमेकांपासून संपूर्णतः विभक्त झाले. १८ डिसेंबर १९१२ मध्ये युंगने फ्रॉईडला लिहिलेल्या एका आक्रमक व काहीशा उद्धट पत्रात फ्रॉईडचे मनोविश्लेषणतंत्र चुकीचे-नव्हे घोडचुकीचे-उदाहरण आहे, स्वतः फ्रॉईड गंडपीडीत आहे, इतकेच नव्हे तर आपले गंड लपवून दुसऱ्यांना मात्र गंडविश्लेषणाचे विषय बनविण्याची हुषारी तो करीत आला आहे, या तऱ्हेचे आरोपपत्र भरलेले दिसते. ३ जानेवारी १९१३ चे फ्रॉईडचे पत्र बरेचसे संयत, थंड व निश्चयी आहे. यापुढे एकमेकांशी कोणतेही व्यक्तीगत संबध न ठेवण्याची सूचना त्याने युंगला याच पत्रात केली आणि सहा जानेवारीच्या आपल्या पत्रात ती युंगने मान्य केली! दोन महामनांची युती अशा तऱ्हेने संपुष्टात आली.

हे असे का व कसे झाले याचे विवेचन करावयाचे म्हटले, तर एखादा स्वतंत्र प्रयत्नच करावयास हवा. पण एका दृष्टीने पाहता असे होणे अपरिहार्यच म्हटले पाहिजे. कारण दोन्हीही व्यक्तिमत्त्वे बरीचशी दुर्दम्य होती. आपापल्या निष्ठा आणि श्रद्धा या बाबतीत पक्की होती. केव्हातरी त्यांच्या वाटा वेगवेगळया होणे साहजिकच होते. त्यात पुन्हा फ्रॉईडची विशिष्ट प्रकारची वस्तुनिष्ठता, त्याचा लैंगिकतावादावरील भर, व्यक्तित्वाच्या स्वतंत्र व सुट्या अभ्यासाविषयी त्याचा आग्रह यासारख्या गोष्टी युंगला मानवत नव्हत्या. मनोविश्लेषणासारख्या ज्ञानक्षेत्रात पंथ काढणे, फळी उभारणे, एकजुटीने वागणे, इमान राखणे इत्यादी भाषा फ्रॉईड कशी वापरू शकतो याचे युंगला आश्चर्य वाटे. इतकेच नव्हे तर ही भाषा हानिकारक व काही अंशी मनोविकृतीची निदर्शक आहे असे त्याचे मत होते. उलटपक्षी मनोविश्लेषण मान्य व्हावे म्हणून युंग त्यांतील लैंगिकतावादाचे सत्य लपवतो; दैवतकथा व तिचे आविष्कार महत्त्वाचे ठरविण्याच्या भरात शास्त्रीय कसोट्या व नेमकेपणा यापासून दूर जातो आणि सामूहिक अबोधमनाविषयी बोलता बोलता गूढवादाकडे घसरत जातो असे फ्रॉईडचे म्हणणे होते. दोघांचेही कार्य व संशोधन ठिकठिकाणी परस्परांचे सूचन, परस्परछेदन तर काही ठिकाणी परस्परसमर्थनही करते. तेव्हा व्यापक अर्थाने पाहता त्यांच्या कामगिरीचा पूरकपणा नजरेत भरण्याइतका ठळक आहे असे म्हणता येईल. स्वतः फ्रॉईड आणि युंग यांना हे उमगले नसेल काय? असणारच. तरीही त्यांचे का बिनसले? कोणतेही एकच व निश्चित उत्तर देणे अवघड आहे. पण असे म्हणता येईल, की संशोधक आणि व्यक्ती हे दोन्ही घटक एकाच माणसात असले तरी दोन्ही घटकांची तब्येत सारखी नसते. संशोधकाला दुसऱ्या माणसातील संशोधक पटला तरी माणूस पटेलच असे नाही. युंग आणि फ्रॉईड या दोघांनाही परस्परातला माणूस पटेनासा झाला असला पाहिजे. नेहमीप्रमाणे फ्रॉईडवादी आणि युंगवादी असे पक्ष निर्माण होऊन आरोप-प्रत्यारोप चालूच राहिले आहेत. पण वास्तविक पाहता फ्रॉईड आणि युंग यांचे कटू वाद व एकमेकाविषयीचे तिखट अभिप्राय यांकडे इतरांनी नक्षत्रताऱ्यांच्या शर्यतीकडे पाहावे, तसेच पाहावे! काहीसे कौतुकाने पण भाग न घेता.

दोघांच्याही जीवनावर या घटनेचे परिणाम घडल्याशिवाय राहिले नाहीत. युंगला अंतर्गत अनिश्चितता आणि एक तऱ्हेचे वाटचुकलेपण बराच काळ बोचत राहिले. बाहेरून काहीतरी वाईट-साईट घडणार आहे असे वाटण्याइतका अंतर्गत तणाव वाढला असे

युंगने स्वतः नमूद केले आहे. मनोविश्लेषणाचा मर्यादित प्रसार लक्षात घेता फ्रॉईडची मैत्री गमावणे म्हणजे युंगच्या दृष्टीने मन मोकळे करण्याची, बौद्धिक देवाण-घेवाणीची जागा गमावणे आणि एक प्रकारच्या विजनवासाचा स्वीकार करण्यासारखे होते. या घटनेनंतर फ्रॉईडच्या लिखाणाचे स्वरूप बदलले असा युंगचा अभिप्राय होता. १९१४ च्या पूर्वार्धात फ्रॉईडने हिस्टरी ऑफ सायकोॲनॅशिटिक मूव्हमेंट हे पुस्तक प्रकाशित केले. पुस्तकाचा सूर जरा चढा आणि आग्रही असून मनोविश्लेषणशास्त्र एकच आहे आणि ते म्हणजे फ्रॉईडप्रणीत असा त्याचा आशय आहे. आपले स्वामित्व पुन्हा एकदा ठासून जाहीर केल्याचा त्यात भास होतो. युंग बाजूला नाही म्हणजे आपल्या स्वामित्वाला आव्हान होय असा फ्रॉईडचा ग्रह झाला असावा असे यावरून म्हणता येईल.

या भाऊबंदकीनंतर युंगने आपली खास मते हिरीरीने मांडायला सुरूवात केली. आपली स्वतःची स्वप्ने व भासचित्रे आणि ऐतिहासिक व वाङ्मयीन आविष्कार यात समांतरता असू शकते असे प्रतिपादन करण्यास युंगने आरंभ केला. इतर व्यक्तींना इतर कालखंडात जर आपल्यासारखेच अनुभव आले असतील तर हे अनुभव केवळ व्यक्तिगत नसून, त्यात सार्वत्रिकता असते असे मानण्यास आधार आहे हे युंगचे विचारसूत्र होते. अशा सार्वत्रिक घटना वा संकेत यांचा अर्थ लावण्यात मानवी जीवनातील आत्मिक बाबींचे युंगला वाटणारे महत्त्व, महत्त्वाची भूमिका बजावी आणि त्यामुळे तो इतर मनोविश्लेषकांपेक्षा वेगळा पडे. उदाहरणार्थ, दैवतकथा आणि धर्म यांच्या तुलनात्मक अभ्यासात अगम्य मनाचा (इन्सेस्टचा) त्याला सार्वत्रिक आढळ झाला हे तो मान्य करी. पण मुलाला आईविषयी वाटणारी ओढ शारीरिक नसून आत्मिक असते आणि पुनर्जन्म व आपल्या 'स्वतः'चे नूतनीकरण या दोहोंच्या आकर्षणामुळे त्याला मातृगर्भाची खेच जाणवत असते असे युंगचे प्रतिपादन होते. मान्य असलेल्या मनोविश्लेषणाला हा विचार विरोधी होता. सायकॉलॉजी ऑफ द अन्कॉन्शस या नावाने पुढे इंग्रजीत प्रकाशित झालेले पुस्तक त्याने १९१२ मध्ये प्रसिद्ध केले. यात युंगची निराळी भूमिका विस्ताराने व ठोकपणे समोर आली. यानंतर युंगच्या मित्रांनीही युंगला गूढवादी व पुस्तकाला अशास्त्रीय म्हणून बाजूला टाकण्यास प्रारंभ केला. यात भर म्हणजे १९१३ मध्ये रक्तप्रलयाची त्याला स्वप्ने पडू लागली. या स्वप्नांमुळे व्यक्तिगत हालअपेष्टा सूचित होतात असे जरी त्याला प्रथमतः वाटले असले तरी पहिले महायुद्ध सुरू होताच ही स्वप्ने भविष्यवाणी होत याची त्याला खात्री पटली व तो तसे म्हणू लागला. अबोधाच्या सामूहिक स्वरूपामुळे व्यक्तिगत स्वप्नातसुद्धा जगाशी संबंधित आशय असतो या दृढ जाणिवेने त्याने युद्धकाळात स्वित्झर्लंडसारख्या तटस्थ देशात राहून आपल्याच अनुभवांची तपशीलवार छाननी करण्यास प्रारंभ केला. त्याचे पुढले कार्य, दिशा व पद्धती यावर आधारल्या आहेत.

कोणताही अनुभव कितीही इररॅशनल (अयुक्तिक) वाटला तरी तो स्वीकारावयाचा हे युंगचे पहिले सूत्र होते. आपल्या शिष्टमान्य व्यक्तित्वाला तडा जाईल या भीतीने सर्वसाधारणतः असा अनुभव येऊ लागताच त्याच्या वाटा बंद करण्याकडे आपली प्रवृत्ती असते. स्वप्न, भासचित्र, आभास, विचारभ्रमण इत्यादी जे जे काही सामोरे येईल त्याची नोंद करावयाची हे युंगचे दुसरे सूत्र होय. कदाचित यामुळे अनुभवाचे प्रारंभीचे स्वरूप बदलते ही शक्यता युंगने दृष्टिआड केली नव्हती. पण अनुभव ताजा असताना त्याचे सर्व धागेदोरे लक्षात येणे अवघड असते. त्याची नोंद केल्यास त्याकडे पुन्हा पुन्हा वळता येते व परिणामी त्याचे अधिक समग्र आकलन शक्य होते असा यामागील विचार होता. शब्दांचे तोकडे सामर्थ्य व भाषेवरील आपले मर्यादित प्रभुत्व यांचाही अनुभव नोंदण्यात कदाचित अडथळा होईल म्हणून स्वप्नप्रतिमा, भास इत्यादींची चित्रे काढावीत, वा लहान दगड-गोटे वगैरेंच्या साहाय्याने घरे, किल्ले, यासारखी खेळांतली बांधकामे करावीत असाही मार्ग युंग सूचित करतो. यासारख्या क्रियांत अबोधाच्या अवस्था प्रतिबिंबित होतात अशी यामागची कल्पना होय. याशिवाय आपल्या स्वप्नात येणाऱ्या व्यक्तींना नावे देऊन त्यांच्याशी जागेपणी संभाषण करण्याचीही त्याची रीत होती. या व्यक्ती म्हणजे साकार होऊन सबोध आयुष्यात सामील होऊ पाहणारा आपल्याच व्यक्तिमत्त्वाचा भाग असतो अशी त्यामागील धारणा होती.

१९१७ नंतर हळूहळू युंगला रक्तप्रलयाची स्वप्ने पडेनाशी झाली. स्वप्ने, आभास वगैरेमधून निर्माण झालेले आणि नोंदवून ठेवलेले 'साहित्य' (मटेरिअल) आणि वेड्यांनी निर्माण केलेले 'साहित्य' यात साम्य आहे हे युंगच्या लक्षात आल्याशिवाय राहिले नाही. हे साहित्य दैवतकथा निर्माण करणाऱ्या कल्पनाशक्तीचे जन्मस्थळ असल्याने असे घडणे स्वाभाविक आहे; पण कलावंत वा शास्त्रज्ञ यांना या 'साहित्या'चे सबोधाशी नाते जोडणे जमते आणि वेड्यांना ते जमत नाही असे युंगचे स्पष्टीकरण आहे. उणीपुरी पंचेचाळीस वर्षे या तऱ्हेने साहित्य गोळा करून युंगने आपला औपपत्तिक संसार थाटला. मानसोपचार, धर्म, शिक्षण, किमया, तत्त्वज्ञान, दैवतकथा यांसारख्या वरवर पाहता वेगळ्या असलेल्या अभ्यासक्षेत्रातले आंतरसंबंध किती निकटचे आहेत हे त्याने फार कौशल्याने दाखवून दिले आहे. इतका सर्व ज्ञानसंभार पेलून त्याची व्यवस्था लावून, मानवी जीवनाला नवी आचार-विचार संहिता उपलब्ध करून देण्याचा घाट घालणाऱ्या युंगच्या प्रतिभेचा - आवाका किती जबरदस्त होता याचा अंदाज बांधणे आवश्यक ठरावे.

१९२८ मध्ये युंगला एक मोठे विचित्र स्वप्न पडले. उत्तर इटलीमधील एखाद्या मध्ययुगीन सरदाराच्या वाड्यातील अंगणात आपण उभे आहोत आणि आपल्या बरोबरचा शेतकरी म्हणतो आहे, "आता आपण सतराव्या शतकात अडकलो" असा या स्वप्नाचा आशय होता. धर्म, इतिहास, तत्त्वज्ञान इत्यादी क्षेत्रे धुंडाळत गेल्यावर युंगच्या लक्षात आले, की सतराव्या शतकात विकास पावलेल्या किमयेच्या विद्येकडे या स्वप्नाचा रोख होता. किमयाविषयक वाङ्मयाचा अभ्यास केल्यावर त्याच्या असेही ध्यानात आले, की सर्वच किमयाकार काही कशाचेही सोने करण्याच्या क्रियेविषयी बोलत नाहीत. बरेचसे आत्मिक बदल घडवून आणणाऱ्या किमयेविषयी बोलत असतात आणि म्हणून त्यांचे वाङ्मयही प्रतीकात्मतेच्या साहाय्याने अबोधाला वाचा फोडण्याचाच प्रयत्न करीत असते. विविध ज्ञानक्षेत्रांतला वरचा फरक वा कालिक भेद यापलिकडची असल्याने अबोधाची भाषा सारखीच असते या तऱ्हेच्या आपल्या निष्कर्षाला पाठिंबा म्हणून सादर केलेला किमया-वाङ्मयाचा हा अभ्यास संपूर्णतया अभिनव म्हणता येईल. मुळात अबोध मन आविष्कृत होऊ पाहते. कारण मानस-उर्जेच्या रूपांतराची गरज निर्माण झालेली असते. किमयेतही रूपांतराची ही आदिकल्पना कार्यकारी झालेली दिसते, असा युंगचा भावार्थ आहे. किमयेचा अभ्यास हे युंगच्या भेदक, विवेचक आणि संश्लेषक शक्तीचे एक उदाहरण झाले. मानसशास्त्रीय वर्ग, सामूहिक मनातील आदिसंकेत, धर्म आणि धर्मांतर्गत स्व-पूर्ति प्रक्रिया, स्वप्नांचे कार्य आणि त्यांचे अर्थ, मानसोपचाराचे स्वरूप व त्याची उद्दिष्टे इत्यादींबाबतच्या त्याच्या उपपत्तींमध्ये याच शक्तीचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही.

व्यासंग आणि संशोधन याचबरोबर युंग एक प्रभावी प्रचारकही होता. युरोपीय देश, इंग्लंड, अमेरिका, आफ्रिका, भारत इत्यादी ठिकाणी व्याख्याने देणे व आपल्या संशोधनासाठी सामग्री गोळा करणे अशा दुहेरी हेतूंनी युंग जात असे. १९३८ मध्ये कलकत्ता विद्यापीठाच्या रौप्यमहोत्सवासाठी युंग भारतात आला होता. साधुसंत आणि मुंबई शहर कटाक्षाने टाळणारा युंग बौद्ध धर्म, बौद्ध मंदिरे व शिल्प आणि बुद्ध यामुळे विलक्षण प्रभावित झाला. 'केवळ ऐतिहासिक व्यक्ती असल्याने बुद्ध जवळचा वाटतो, तर ख्रिस्त ऐतिहासिक व्यक्ती आणि देव दोन्ही असल्याने जरा दूरचाच वाटतो', '...खलत्वाला स्वीकारून मग निर्बंध ही आदर्श अवस्था मानणारा भारतीय दृष्टिकोन श्रेष्ठ आहे', या भारताविषयीच्या त्याच्या काही प्रतिक्रिया होत.

देशोदेशीचे मनोरुग्ण उपचारासाठी व सल्लामसलतीसाठी घरी येत आहेत, त्याच्या विचारात आस्था असलेल्या व्यक्ती, शिष्य, चाहते आवतीभोवती वावरत आहेत, एमासारखी सुविद्य पत्नी, चार मुले आणि स्वतःच्या मर्जीनुसार बांधलेले घर यामुळे दिवस भरलेले आहेत असे युंगचे जीवन होते. १९५५ मध्ये एमा निधन पावली. स्वतः मनोविश्लेषक असलेली आणि 'होली ग्रेल' या पाश्चात्य दैवतकथेचे संशोधन करणारी एमा नुसती गृहिणी नव्हती ही उघड आहे. पण इतरांना वाटे त्यापेक्षा युंगच्या आयुष्यात एमा महत्त्वाची होती. याचे प्रत्यंतर पत्रांत दिसते. पण यातही त्यांचे व्यक्तिगत संबंध रूढ अर्थाने दिसून येत नाहीत. 'तुला फक्त सामूहिक अबोधमनांतच रस आहे' असे एमा त्याला म्हणे हे एका अर्थाने खरे आहे. आपल्या व्यक्तिगत जीवनालाही तो आपल्या कार्यातच पाही. आत्मचरित्रात्मक असलेल्या लिखाणातही युंग ही व्यक्ती दिसत नाही अशी अनेकांची तक्रार आहे. मानसविचारवंत युंगच त्यातही

दिसतो असा अनेकांचा आक्षेप आहे. असे होणे स्वाभाविक म्हटले पाहिजे. कारण युंग स्वतःला व्यक्ती न मानता कार्यच मानी. प्रेषिताच्या भावनेने काम करणाऱ्या माणसांचे नेहमी असेच होते. त्यांना माणसांना होणारी सारी सुखदुःखे होतात, पण हे प्रेषित जीव त्या सुखदुःखात नसतात. युंगचे असेच होते. तडा गेलेल्या सामूहिक धार्मिकतेच्या जागी व्यक्तीचे मूळ समूहात आणि समूहाचे अस्तित्वकारण बुद्धिवादाच्या नावाखाली नाकारल्या गेलेल्या अबोधाच्या सातत्यात असते या तत्त्वाची प्रतिष्ठापना करू पाहणाऱ्या युंगला आपले वेगळे अस्तित्व ही गृहीत धरण्याची बाब वाटली, रंगवून सांगण्यासारखी गोष्ट नव्हे.

पंचाऐंशी वर्षांचा होऊन १९६१ मध्ये युंग निधन पावला तो एखाद्या तृप्त वृद्धासारखा. तो मरण पावला तरी कसे म्हणावे? कारण त्याचा पुनर्जन्मावर विश्वास होता!